# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

## पशुवैद्यकीय विभाग

### कै. नारायण मेघाजी लोखंडे, सभागृह (कामगार भवन), पिंपरी १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागातंर्गत संत निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणीसंग्रहालय, संभाजीनगर याठिकाणी सल्लागार या अभिनामाचे पद दोन वर्षे कालावधीकरीता हंगामी स्वरुपात भरावयाचे आहे. यापदाकरीता शैक्षणिक अर्हता व पद संख्या तसेच मासिक मानधनाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | मासिक मानधन | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | सल्लागार | ०१ | ७०,००० | ४. रेप टाईल्स आणि ऍम्पीबिअन व एव्हेरी (Reptile and Amphibians, Aviary) मधील कामकाजाचा किमान १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>५. उमेदवारांने शासकीय स्तरावर वन्य जीव सल्लागार विषयक कामकाजाचा अनुभव.<br>६. वन्य जीव व सर्प क्षेत्रात Naturalist म्हणून कामकाज केलेचा किमान १० वर्षेचा अनुभव. |

उक्त पदाकरीता खालीलप्रमाणे अटी ग्राह्य राहतील.

१. सल्लागार या पदावरील नेमणूका पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपात आहे. त्यामुळे अर्जदारास महापालिका आस्थापनेवर कोणत्याही कायम पदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही.
२. ज्या दिवशी महानगरपालिकेस या पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय त्यांच्या मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.
३. अर्जासोबत अलीकडे काढलेले स्वतःचे दोन रंगीत फोटो जोडावे. तसेच लिफाफ्यावर संबंधित पदासाठी अर्ज नमूद करावे.
४. जाहिरातीतील नमूद पदासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
५. अर्जासोबत अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
६. मुलाखतीस येण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.
७. उपरोक्त पदांना विहित केलेनुसार मासिक मानधन अदा केले जाईल.

तरी इच्छुक व अर्हता धारक उमेदवारांनी दि. ४ /०३/२०२४ अखेर पर्यत आपले अर्ज मा. आयुक्त यांचे नावे पशुवैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कै. नारायण मेघाजी लोखंडे, सभागृह (कामगार भवन) नेहरुनगर रोड, पिंपरी १८ या पत्त्यावर आवश्यक कागदपत्रांसह समक्ष सादर करावेत. मुदतीनंतर समक्ष / पोस्टाव्दारे / कुरिअरव्दारे प्राप्त झालेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही. याची स्पष्ट नोंद घ्यावी. सदर पात्र उमेदवारांच्या प्रकट मुलाखती दि. ५ / ०३ /२०२४ रोजी वेळ स.११.०० वा. मा.स्थायी समिती समिती सभागृह, तिसरी मजला, महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत, जुना पुणे-मुंबई रोड, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ यांचे दालनात घेण्यात येतील. यासाठी उपस्थित राहणे कामी पत्रव्यवहार केला जाणार नाही.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

जाहिरात क्र.
जा. क्र. पवै/०२/कावि/३८ /२०२४ दि. २८ /०२/२०२४